**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १० फेब्रुवारी २०२६**

**ठळक बातम्या**

1. **राज्याच्या विविध भागातले जलसंपदा विभागाचे अपूर्णप्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचं दीर्घ मुदतीचं कर्ज घ्यायलाराज्य मंत्रिमंडळाची मान्यता.**
2. **नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील मौजा लिंगा इथं कोल टू केमिकल प्रकल्पासाठी ११७ हेक्टर १९ आर जमीनिस देखील मंजूरी.**
3. **महाराष्ट्राच्या नवनियुक्त उपमुख्यमंत्री सुनेत्रापवार यांनी स्वीकारला पदभार.**
4. **चंद्रपूर महानगरपालिकेत अखेर भाजप आणि शिवसेना (ठाकरे) गटाची युती, महापौरपदी भाजपाच्या संगीता खांडेकर.**

   **आणि**
5. **काटोल तालुक्यातील १६ योजनाबाह्य रस्त्यांचा विकास रस्ते विकास योजनेतून होणार.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मंत्रिमंडळ निर्णय

राज्याच्या विविध भागातले जलसंपदा विभागाचे अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डकडून १५ हजार कोटी रुपयांचं दीर्घ मुदतीचं कर्ज घ्यायला राज्य मंत्रिमंडळानं आज मान्यता दिली. अपूर्ण असलेले हे ४० प्रकल्प, १०० नाले पूर्ण झाल्यावर ८ लाख एकर जमीन ओलिता खाली येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिली. मंत्रालयात झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मंत्री उपस्थित होते. नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर तालुक्यातील मौजा लिंगा इथं कोल टू केमिकल प्रकल्पासाठी ११७ हेक्टर १९ आर जमीन एमआयडीसीला देण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यासह राज्यात 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' अभियान राबवण्याचा निर्णय घेण्यात आला असून १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत हे अभियान चालणार आहे. ग्रामपंचायतींना राज्यस्तरीय पुरस्कारांतर्गत ५ लाखांपासून २ कोटी रुपयांपर्यंत बक्षिसं देण्यात येणार असून दरवर्षी ८० कोटी ७५

लाखांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनातील बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्यास तसंच महाराष्ट्र पीपीपी धोरण-२०२६ जाहीर करण्यास मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

चंद्रपूर मनपा

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मदतीनं चंद्रपूरच्या महापौरपदी भाजपाच्या संगीता खांडेकर विजयी झाल्या आहेत. त्यांना ३२ मतं मिळाली तर काँग्रेसच्या महापौर पदाच्या उमेदवार वैशाली महाडोळे यांना ३१ नगरसेवकांनी पाठिंबा दिला. उपमहापौर पदी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रशांत दानव विजयी झाले आहेत. शिवसेनेच्या नगरसेवकांनी महापौर आणि उपमहापौर पदाच्या निवडणुकीत भाजपाला पाठिंबा दिला. वंचित बहुजन आघाडी आणि MIM नं या निवडणुकीत भाग घेतला नाही. चंद्रपूरच्या विकासासाठी हे सर्व पक्ष एकत्र आल्याची माहिती आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी दिली. उद्धव ठाकरे यांच्या पक्षानं या निवडणुकीत भाजपाला पाठिंबा दिल्याचा परिणाम राज्यभर दिसून येईल असा इशारा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे......

***(होल्ड बाईट- काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ ४० सेकंद)***
***काँग्रेसला 31 वोट मिळाली तर भारतीय जनता पक्षाला चंद्रपूरमध्ये महापौर पदासाठी 32 मिळाली आणि 32 मतांची बेरीज करत असताना उबाठा भारतीय जनता पक्षाला पाठिंबा दिला. वास्तविक पाहता उबाठा हा मविआ आणि इंडिया अलायन्स चा भाग असल्यामुळे त्यांनी कॉंग्रेसला पाठिंबा देणे अभिप्रेत होता. मात्र दुर्दैवाने तसे होऊ शकले नाही. आणि याचे परिणाम निश्चित स्वरूपामध्ये महाराष्ट्रवर याचे पडसाद उमटल्याशिवाय राहणार नाही, अशी हि आजची परिस्थिती आहे. नवा मित्रपक्ष म्हणून वंचित बहुजन आघाडी हा काँग्रेसच्या सोबत घेण्याचा एक प्रामाणिक प्रयत्न हा झाला. दोन नगरसेवक हे वंचित चंद्रपूरमध्ये होते आणि दोन नगरसेवक गैरहजर राहिले यांनी हजर राहून काँग्रेसला मदत केली असतीत तरी देखील काँग्रेसचा महापौर होऊ शकला असता.***

महाविकास आघाडीच्या भवितव्याबद्दल पक्षनेत्यांशी चर्चा करुन पुढचा निर्णय घेऊ असंही ते म्हणाले. MIM आणि वंचितनं या निवडणुकीत काँग्रेसला मदत दिली नाही याबद्दल सपकाळ यांनी नाराजी व्यक्त केली.

चंद्रशेखर बावनकुळे

राज्यातील जनतेनं  नकारात्मक राजकारण नाकारून महायुतीच्या विकासाला स्पष्ट कौल दिला आहे, असं महसूल मंत्री आणि  नागपूर-अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितलं . नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी महाविकास आघाडीवर टीका करत विरोधकांनी केवळ टीकेचं  राजकारण सोडून आत्मपरीक्षण करावं, असा सल्ला दिला. जिल्हा परिषद निवडणुकीतील यश हे 'डबल इंजिन' सरकारच्या विकासकामांचं फलित असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. मुंबईतील मविआच्या बैठकीवर टिप्पणी करताना, जनतेनं  नाकारलेल्या मुद्द्यांवर राजकारण न करता विकासाला प्राधान्य द्यावं, असंही बावनकुळे म्हणाले.

लोकसभा-राज्यसभा

लोकसभेत केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ वर चर्चा सुरु झाली. काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी चर्चेला सुरुवात केली. तत्पूर्वी सकाळच्या सत्रात लोकसभेचं कामकाज अनेकदा तहकूब झालं. सदनाचं कामकाज सकाळी ११ वाजता सुरु होताच केवळ एका मिनिटात कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत आणि त्यानंतर दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. सदनाचं कामकाज सकाळी सुरु झाल्यावर पीठासीन अधिकाऱ्यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. मात्र काँग्रेस, तृणमूल काँग्रेस आणि द्रमुक सह विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी सुरु केली. या गदारोळातच केंद्रीय पशुपालन आणि दुग्ध उत्पादन राज्यमंत्री एस. पी. सिंह यांनी प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न केला. पीठासीन अधिकाऱ्यांनी अनेकदा सूचना देऊनही गदारोळ सुरूच राहिल्यानं कामकाज तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज वारंवार खंडित होण्याला विरोधी पक्ष जबाबदार असल्याची टीका संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केली. ते आज संसद परिसरात प्रसार माध्यमांशी बोलत होते. विरोधी पक्षाला संसदेच्या प्रतिष्ठेबाबत कसलाही आदर नाही हे त्यांच्या वर्तनातून दिसून येत असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यसभेत केंद्रीय अर्थसंकल्पावर चर्चा सुरु आहे. शिवसेनेचे खासदार मिलिंद देवरा या चर्चेत सहभागी झाले. काँग्रेसचे खासदार पी. चिदंबरम यांनी काल सदनात चर्चेला सुरुवात केली होती.

आशिष जयस्वाल

आगामी राज्य अर्थसंकल्पाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या तयारीला वेग आला आहे. उद्यापासून जिल्हा नियोजन समितीच्या आणि विभागीय आढाव्याच्या बैठका सुरू

होणार असल्याची माहिती राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी दिली आहे. ते आज नागपूरमध्ये माध्यमांशी बोलत होते. जिल्ह्यांच्या गरजा ओळखून विकासकामांना गती देण्यावर शासनाचा भर राहणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

सुनेत्रा अजित पवार

राज्याच्या नवनियुक्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज मंत्रालयात आपला पदभार स्वीकारला. त्याआधी त्यांनी सिध्दीविनायक मंदिरात जाऊन दर्शन घेतलं, तसंच चैत्यभूमीवर जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पचक्र अर्पण केलं.

काटोल रस्ते

काटोल तालुक्यातील ग्रामीण दळणवळणाला गती देण्यासाठी 'योजनाबाह्य' आणि 'अवर्गीकृत' १६ रस्त्यांचा रस्ते विकास योजना २००१-२१ मध्ये 'ग्रामीण मार्ग' म्हणून समावेश करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय ग्रामविकास विभागाने घेतला आहे. या निर्णयामुळे खापा ते वर्धा जिल्हा सीमा, सावळी खुर्द-रिधोरा धंतोलीसह तालुक्यातील अनेक महत्त्वाच्या रस्त्यांच्या खडीकरण आणि डांबरीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. निधीची अडचण दूर होऊन जिल्हा नियोजन आणि ग्रामविकास निधीतून रस्ते चकाचक होणार असून संत्री उत्पादक पट्ट्यातील गावांना मोठा लाभ होणार आहे. ग्रामस्थांनी या निर्णयाचं स्वागत केलं असून पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री जयकुमार गोरे यांचे आभार मानले आहेत.

बारावी परीक्षा

राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात झाली. या परीक्षेसाठी राज्यातून एकूण १५ लाख ३२ हजार ४८७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. १८ मार्चपर्यंत राज्यातल्या नऊ विभागीय मंडळांत ही परीक्षा होणार आहे.

प्रताप सरनाईक

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील आडोशी बोगद्याजवळील भीषण अपघाताच्या पार्श्वभूमीवर राज्यभरातील अवजड वाहनांची व्यापक आणि पारदर्शक तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. मंत्रालयातील उच्चस्तरीय बैठकीत मोटार परिवहन आणि पोलीस विभागाला चालकांच्या बेपर्वाईवर नियंत्रण आणि जनजागृतीवर भर देण्याचे निर्देश देण्यात आले.

## वाहतूक धोकादायक

भंडारा-तुमसर-बालाघाट राष्ट्रीय महामार्गावरील खड्ड्यांमुळे वाहतूक अत्यंत धोकादायक बनली असून तुमसर, सिहोरा आणि बपेरा परिसरात अपघातांची मालिका सुरू आहे. रस्ते दुरुस्तीबाबत ठोस कारवाई न झाल्याच्या निषेधार्थ चुल्हाड येथे सर्वपक्षीय पदाधिकारी आणि नागरिकांनी उपोषण सुरू केलं असून तातडीनं दुरुस्ती तसच लेखी आश्वासनाची मागणी करण्यात आली आहे.

## रेल्वे

फेब्रुवारी २०२६ मधील अतिरिक्त प्रवासी गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेद्वारे एलटीटी-नागपूर, पुणे-नागपूर आणि सीएसएमटी-नागपूर दरम्यान विशेष TOD गाड्या चालविण्यात येणार आहेत. एलटीटी-नागपूर (४ फेऱ्या), पुणे-नागपूर (एकूण ६ फेऱ्या) आणि सीएसएमटी-नागपूर (२ फेऱ्या) अशा एकूण १२ विशेष फेऱ्या धावणार आहेत. या गाड्यांना नाशिक रोड, मनमाड, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा आदी प्रमुख स्थानकांवर थांबे असतील. सर्व विशेष गाड्या एलएचबी डब्यांसह धावणार असून वातानुकूलित, शयनयान व सामान्य वर्गाची सुविधा उपलब्ध असेल. या गाड्यांचे आरक्षण १० फेब्रुवारी २०२६ पासून आयआरसीटीसी संकेतस्थळ व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर सुरू होणार आहे.

## जागितक कडधान्य दिन

आज जागतिक कडधान्य दिन आहे. कडधान्याबद्दल जनजागृती करणं आणि शाश्वत कृषी अन्न प्रणालीमधली त्यांची मूलभूत भूमिका समजून घेणं, या उद्देशानं हा दिवस पाळला जातो.

## आश्रमशाळा

राज्यातल्या आश्रमशाळांमध्ये शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे हेल्थकार्ड बनवण्यात येणार आहेत. या उपक्रमासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी माहिती राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी दिली.

*****